N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** जामखेड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0085 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/02/2024 03:27

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 22/02/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 28/02/2024
**Time From (वेळेपासून):** 18:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 29/02/2024 **Time (वेळ):** 03:03 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/02/2024 03:03 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** खर्डा चौक जामखेड ,जामखेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): कांतीलाल श्रीमंत जगदाळे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1985

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वाघा, पोनान्नज, ताजामखेड, ,जामखेड, ,जामखेड,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वाघा, पोनान्नज, ताजामखेड, ,जामखेड, ,जामखेड,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9423461019

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नेताजी शिवाजी भाबड | | | 1. न्याती इबोनी-4,फलट नं41, , उंडरी गाव,पुणे ,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | शामराव माणिकराव बारस्कर | | | 1. वाघा, ताजामखेड,ताजामखेड, जामखेड,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम त्यात 500 रुपये दराच्या 30 भारतीय चलनी नोटा | 15,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

15,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक-29/02/2024

मी कांतीलाल श्रीमंत जगदाळे, वय-39 वर्षे, व्यवसाय-शेती, रा.वाघा, पो.नान्नज, ता.जामखेड, जि.अहमदनगर, मो.नं.9423461019

समक्ष हजर राहुन सांगतो कि,मी वरिल ठिकाणी परिवारासह राहत असुन शेती व्यवसाय करून माझे परिवाराचा उदरनिर्वाह करतो. मी दिनांक 22/02/2024 रोजी सकाळी 10.00 वाजता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत विहीर खोदण्याचा प्रस्ताव मंजुर करण्यासाठी लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार पोलीस निरीक्षक श्री. आल्हाट यांना फोनद्वारे दिली होती.त्यानंतर पो.नि आल्हाट यांनी मला जामखेड येथे चार वाजता सुरक्षीत ठिकाणी थांबण्यास सांगीतले असता मी त्याप्रमाणे थांबुन होतो,साडेचार वाजेचे सुमारास मला पोनि आल्हाट यांनी ते जामखेड येथे थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी बोलावुन घेतले.त्यानुसार मी त्याठिकाणी गेलो त्यावेळी पोनि आल्हाट,त्यांचा स्टाफ व दोन पंच असे थांबलेले होते. पोनि आल्हाट यांनी माझा परीचय करुन घेवुन त्यांनी त्यांचा व त्यांचे सोबतच्या स्टाफचा तसेच पंचांशी माझा परीचय करुन दिला.

त्यानंतर पो.नि. आल्हाट यांनी मला माझी तक्रार विचारली असता मी सांगीतले की, मौजे वाघा, ता. जामखेड येथे गट नं 114 मध्ये माझी पत्नी नामे सोनाली कांतीलाल जगदाळे हिचे नावे सुमारे दोन हेक्टर क्षेत्र आहे, सदर क्षेत्रामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तिक जलसंचिन विहीर खोदण्याकरीता मी प्रस्ताव तयार करुन वाघा ग्रामपंचायत येथे सादर केला होता,सदर प्रस्तावाच्या मंजुरीच्या अनुषंगाने मी दिनांक 21.02.2024 रोजी आमच्या ग्रामपंचायतच्या सरपंच सौ.सविता बारस्कर यांचे पती श्री. शामराव बारस्कर यांचेकडे चैकशी केली असता त्यांनी मला सांगीतले की, मी उदया पंचायत समिती जामखेड येथे ग्रामसेवक भाबड साहेबांची भेट घालुन देतो, सदर प्रस्ताव मंजुर करण्यासाठी 20 ते 22 हजार रुपये खर्च येतो असे सांगितले त्यावेळी श्री. बारस्कर हे ग्रामसेवक भाबड यांचेकरीता लाच मागणी करत असल्याचे माझ्या लक्षात आल्याने व मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी सदर तक्रार देत आहे असे सांगीतले, तसेच सदरची तक्रार मी माझ्या स्वहस्ताक्षरात लिहुन दिली, त्यावर मी, पो.नि. आल्हाट व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर पोनि आल्हाट यांचे सुचनेप्रमाणे सदर लाच मागणी पडताळणी कारवाई मध्ये व्हॉईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन मला त्याबाबचे प्रात्यक्षीक पोकॉ कराड यांनी करुन दाखविले, त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पोकॉ कराड यांनी नवीन मेमरी कार्ड टाकुन तो चालु केले त्यानंतर माझ्या 9423461019 या मोबाईल क्रमांकावरुन श्री बारस्कर यांचा मोबाईल क्र. 9423389015 यावर कॉल करुन त्यांना जामखेड येथे येण्यास सांगीतले,सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्यात आला त्यानंतर पोकॉ कराड यांनी सदरचा व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझ्या ताब्यात दिला व पंच क्र. 1 यांचे सोबत माझ्या दुचाकी वाहनाने शामराव बारस्कर यांची भेट घेण्यासाठी जामखेड येथे सायंकाळी सव्वासहा वाजेचे सुमारास रवाना केले. त्यानंतर खर्डा फाटा येथे मी श्री.बारस्कर यांची पंचासमक्ष भेट घेतली असता त्यांनी मला सदर विहीर प्रकरण मंजुर करण्यासाठी वीस ते बाव्वीस हजार रुपये लागतील, ग्रामसेवक तुमच्याकडुन पैसे घेणार नाही, माझ्याकडुन घेईल असे सांगुन लाच मागणी केली व उदया दुपारी 12.00 वाजता पंचायत समिती येथे या, ग्रामसेवकाची भेट घालुन देतो असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे सापळा पथक थांबले त्या ठिकाणी आलो, माझ्या ताब्यातील व्हॉईस रेकार्डर पोकॉ कराड यांनी

ताब्यात घेवुन बंद केले, त्यानंतर मी व पंचांनी पडताळणी दरम्यान च्या घडलेल्या हकिकतीबाबत पो.नि. आल्हाट यांना माहिती दिली, त्यानंतर पो.नि.आल्हाट यांनी पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वणीमुद्रीत संभाषण ऐकले असता श्री. बारस्कर यांनी माझ्याकडे माझ्या विहीर खोदण्याचा प्रस्ताव मंजुर करुन देण्यासाठी ग्रामसेवक भाबड यांचेकरीता 20 ते 22 हजार रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले,त्यानंतर शासकीय वाहनात लॅपटॉपवर लाचमागणी पडताळणी पंचनामा टंकलिखीत करण्यात आला. त्यानंतर मला गोपणीयतेच्या सुचना देवुन दिनांक 23/02/.2024 रोजी दुपारी 12.00 वाजता जामखेड येथे सुरक्षीत ठिकाणी हजर राहण्याबाबत पो.नि. आल्हाट यांनी सुचना देवुन परी जाणेस मोकळीक दिली.

त्यानंतर दिनांक 23/.02/2024 रोजी 12.00 वाजता .पो.नि.आल्हाट हे जामखेड येथे सुरक्षीत ठिकाणी आले व त्यांनी मला सदर सुरक्षीत ठिकाणी फोन करुन बोलावुन घेतले त्यानुसार मी त्यांचेकडे गेलो, त्यावेळी मी पोनि आल्हाट यांना सांगीतले की, श्री.बारस्कर यांनी मला सकाळी फोन करुन सांगीतले की, दुपारी दिड वाजेनंतर भेटु मी बाहेरगावी आलेलो आहे. त्यामुळे आंम्ही थांबुन राहीलो, त्यानंतर पोकॉ कराड यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु केला त्यावेळी मी दुपारी दिड वाजेचे सुमारास श्री. बारस्कर यांना माझ्या 9423461019 या मोबाईल क्रमांकावरुन श्री बारस्कर यांचा मोबाईल क्र. 9423389015 यावर कॉल केला असता त्यांनी सांगीतले की, मी श्रीगोंदा येथे आहे, मी आल्यानंतर बघु, असे म्हणाले सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आला त्यानंतर आम्ही थांबुन राहिलो.त्यानंतर चार वाजेपर्यंत त्यांचा कॉल आला नाही म्हणुन मी पुन्हा कॉल केला त्यावेळी त्यांनी मला पंचायत समिती जामखेड कडे या असे सांगीतले,सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आला त्यानंतर पोनि आल्हाट यांचे सुचनेवरुन पोकॉ कराड यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या ताब्यात दिला व मला पंच क्र.1 सह पंचायत समिती जामखेड येथे श्री. बारस्कर व ग्रामसेवक भाबड यांची भेट घेण्यासाठी सव्वाचार वाजेचे सुमारास माझ्याकडील दुचाकी वाहनाने रवाना केले.त्यानंतर मी व पंच क्र.1 असे पंचायत समिती जामखेड येथे जावुन श्री.बारस्कर यांची भेट घेतली त्यावेळी त्यांनी आमची ग्रामसेवक भाबड यांचेशी भेट घालुन दिली,त्यावेळी ग्रामसेवक भाबड यांनी पंचासमक्ष माझ्याकडे माझ्या विहीर खोदकामाचा प्रस्ताव मंजुर करण्यासाठी 15000/- रुपये लाच मागणी करुन सदर लाच रक्कम श्री.बारस्कर यांचेकडे देण्यास सांगीतली, त्यावेळी श्री.बारस्कर म्हणाले, बुधवारी माझ्याकडे आणुन दे, मंगळवार पर्यंत तुझा प्रस्ताव मंजुर होईल.त्यानंतर मी ठीक आहे असे म्हणुन मी व पंच क्र.1 असे सापळा पथक थांबले त्याठिकाणी परत आलो व मी व पंचाने घडलेली हकिकत पोनि आल्हाट यांना सांगीतली, त्यानंतर पोनि आल्हाट यांनी पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वणीमुद्रीत संभाषण ऐकले असता माझे विहीर प्रकरण मंजुर करण्यासाठी ग्रामसेवक भाबड यांनी माझ्याकडे 15000/-रुपये लाच मागणी करुन ती स्वीकारण्याचे मान्य केले व सदर लाच रक्कम श्री. बारस्कर यांचेकडे देण्यास सांगीतले तसेच श्री.बारस्कर यांनी बुधवारी मला सदर लाच रक्कम घेवुन बोलविल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर शासकीय वाहनात लॅपटॉपवर लाचमागणी पडताळणी पंचनामा टंकलिखीत करण्यात आला व मला गोपणीयतेच्या सुचना देवुन बुधवार दिनांक 28/02/2024 रोजी लाच रकमेसह दुपारी 2.00 वाजता जामखेड येथे सुरक्षीत ठिकाणी थांबणेबाबत सुचना दिल्या व मला घरी जाणेस मोकळीक दिली.

त्यानंतर बुधवार दिनांक 28/02/2024 रोजी दुपारी दोन वाजता पोनि आल्हाट पथकासह जामखेड येथे सुरक्षीत ठिकाणी आले त्यांनी मला फोन करुन सदर ठिकाणी बोलावुन घेतले, त्यावेळी पोनि आल्हाट यांनी सापळा पथाकामध्ये नव्याने सामील झालेले पोनि गोर्डे यांची ओळख करून दिली त्यानंतर मी माझ्या बचतीतील 15000/- रुपये लाच रक्कम म्हणुन पोनि आल्हाट यांचेकडे हजर केले, त्यानंतर मला अँथ्राँसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या गुणधर्माचे उजेडात व अंधारात प्रात्यक्षीक करुन दाखविले.त्यानंतर मी हजर केलेल्या भारतीय चलनी नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले व त्यावर अँथ्राँसीन पावडर लावण्यात आले व सदर लाच रक्कम माझ्या पॅटच्या समोरील बाजुच्या उजव्या खिश्यात ठेवण्यात आली सापळा कारवाई बाबत मला व पंचांना सुचना दिल्या, त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले,त्यानंतर साडेतीन वाजेचे सुमारास पोनि आल्हाट यांचे सुचनेप्रमाणे मी माझ्या 9423461019 या मोबाईल क्रमांकावरुन श्री बारस्कर यांचा मोबाईल क्र. 9423389015 यावर कॉल केला असता ते म्हणाले, आपण चार वाजता भेटु,सदर चा कॉल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्यात आला व आंम्ही सुरक्षीत ठिकाणी थांबुन राहिलो.

त्यानंतर मी सव्वाचार वाजेचे सुमारास श्री. बारस्कर यांना फोन केला असता त्यांनी मला खर्डा चैक, येथील पोलीस चैकी समोरील चहाच्या हॉटेलजवळ येण्यास सांगीतले,सदरचा कॉल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्यात आला, त्यानंतर त्याठिकाणी सापळा लावण्याचे ठरले त्याप्रमाणे व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या ताब्यात दिला,त्यानंतर मला व पंच क्र.1 यांना खर्डा चैक येथे श्री. बारस्कर यांना लाच रक्कम देण्यासाठी रवाना केले, आंम्ही खर्डा चैक येथे पोहचलो तेव्हा आमचे मागोमाग पोनि आल्हाट, सापळा पथक व पंच क्र. 2 असे शासकीय वाहनासह आले व

पोलीस चैकी समोरील माउली टि सेंटर या चहाच्या हॉटेलच्या आजुबाजुला सापळा लावुन थांबुन राहिले,थोडयाच वेळात श्री. बारस्कर माउली टि सेंटर या चहाच्या हॉटेलवर आले, त्यावेळी मी त्यांचेसोबत चहा घेण्यासाठी बसलो व आमच्या पाठीमागील बाजुच्या बाकावर पंच क्र. 1 येवुन बसले. त्यावेळी मी लाच रक्कम पॅटच्या उजव्या खिशातुन काढुन त्यांचेसमोर धरली व पंधरा हजार रूपये आहे असे म्हणालो त्यावेळी त्यांनी सदर लाच रक्कम स्विकारून त्यांचे पॅटच्या समोरील डाव्या खिशात ठेवले. त्यावेळी मी सापळा पथकास नियोजित इशारा केला, त्यावेळी पो.नि. आल्हाट व सापळा पथक व पंच क्र.2 तेथे आले व त्यांनी श्री.बारस्कर यांना लाच रकमेसह रंगेहात पकडले. त्यानंतर पो.नि.आल्हाट यांनी मला जामखेड पोलीस स्टेशन येथे येण्यास सांगितले व त्यांनी श्री.बारस्कर यांना ताब्यात घेवुन जामखेड पोलीस स्टेशन येथे घेवुन आले त्यानंतर बारस्कर यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव शामराव माणिकराव बारस्कर,वय-55 वर्षे,धंदा-नोकरी,प्राध्यापक,जामखेड महाविदयालय, जामखेड,मुळ रा.वाघा,ता.जामखेड,जि.अहमदनगर,ह.मु.कार्ले यांचे फलॅट मध्ये किरायाने,शिवनेरी अॅकडमी जवळ,विकास नगर,बीड रोड,जामखेड असे सांगितले.त्यानंतर पो.नि.आल्हाट यांचे सुचनेवरून मी पो.नि.गोर्डे यांचे सोबत ग्रामसेवक भाबड यांना ताब्यात घेण्यासाठी साकत मार्गे दिघोळ गावाकडे रवाना झालो.साकत गावाजवळ ग्रामसेवक भाबड यांची भेट झाली त्यावेळी पो.नि.गोर्डे यांनी त्यांना सदर कारवाईबाबत माहिती देवुन ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही जामखेड पोलीस स्टेशन येथे आलो त्यावेळी पो.नि.आल्हाट यांनी ग्रामसेवक भाबड यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव नेताजी शिवाजी भाबड,वय-47 वर्षे,धंदा-ग्रामसेवक,वाघा,ता.जामखेड,जि. अहमदनगर,रा.न्याती इबोनी-4,फलॅट नं.41,उंडरी गाव,पुण,ह.मु.भोरे यांची रुम, तपनेश्वर रोड, जामखेड जि. अहमदनगर असे सांगितले.सदर कारवाईचा पंचनामा पो.नि.आल्हाट व त्यांचे पथकाने जामखेड पोलीस स्टेशन येथे केला आहे.

तरी दिनांक 22/02/2024 रोजी पडताळणी कारवाईच्या वेळी सायंकाळी सव्वासहा ते ते सात वाजेचे दरम्यान तसेच दिनांक 23/02/2024 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाईच्या वेळी सव्वाचार ते पावनेसहा वाजेचे दरम्यान 1) नेताजी शिवाजी भाबड,वय-47 वर्षे,धंदा-ग्रामसेवक,वाघा,ता.जामखेड,जि.अहमदनगर,रा. न्याती इबोनी-4,फलॅट नं.41, उंडरी गाव, पुणे, यांनी माझ्या विहीरीचे प्रकरण मंजुर करण्यासाठी माझ्याकडे पंचासमक्ष 15000/- रुपये लाच मागणी केली व सदर लाच रक्कम बारस्कर यांचे कडे देण्यास सांगितली व 2) शामराव माणिकराव बारस्कर, वय-55 वर्षे, धंदा - नोकरी, प्राध्यापक, जामखेड महाविदयालय, जामखेड, सी.सी.टी.एन. एस.प्रणाली मध्ये शब्दाची मर्यादी संपल्याने मुळ फिर्याद सोबत जोडली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Mahesh Vishnu Patil(I (Inspector)) / API **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
Jagdale KS

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.हे.कॉ/१०३
एस.डी.लोखंडे
जामखेड प्रोस्टे.अहमदनगर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Mahesh Vishnu Pat
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): API